मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४४२ वा • शुक्रवार, ता. ७ नोव्हेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००



मडगाव नगरपालिकेच्या मनमानीविरोधात

## भीमशक्ती संघटना संतप्त

### अल्पसंख्याक, मागासवर्गीय कामगारांवर अन्यायाचा आरोप

**मडगाव । रयत समाचार**

गोव्यातील भीमशक्ती संघटना या सामाजिक संस्थेने मडगाव नगरपालिकेच्या अध्यक्ष दामोदर शिरोडकर यांच्यावर सत्तेचा उघड गैरवापर व अल्पसंख्याक व मागासवर्गीय समाजातील कामगारांवर अन्याय होत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. भीमशक्ती संघटना दक्षिण गोवा जिल्हाध्यक्ष साविओ कुतिन्हो यांनी सांगितले की, मडगाव नगरपालिकेच्या निष्काळजी कारभारामुळे कामगारांची कामावरून हकालपट्टी होण्यासारखी वेळ आली आहे. सर्व दैनिक वेतनधारक कामगारांचे कामाचे आदेश २ नोव्हेंबर २०२५ रोजी संपले, तरी नवीन आदेश निघालेले नसतानाही कामगारांना कामावर हजर राहण्यास भाग पाडले जात आहे. यामुळे कचरा संकलन करणाऱ्या गरीब कामगारांवर अन्याय होत आहे, असा संघटनेचा आरोप आहे. कुतिन्हो यांनी पुढे सांगितले की, कामाचे आदेश संपणार असल्याने पर्यवेक्षकांनी संबंधित कामगारांना ३ नोव्हेंबर रोजी कामावर न येण्याचे सांगितले होते. मात्र, कचरा संकलन विभागातील दैनिक वेतनधारक कामगारांना कोणताही वैध आदेश नसतानाही कामावर येण्यासाठी दबाव आणण्यात आला. या कामगारांपैकी अकरा कामगारांनी ४ ऑगस्ट २०२५ रोजी आपल्या नियमितीकरणासाठी न्यायालयीन लढाई जिंकली असून, तीन महिने उलटूनही त्यांना नियमितीकरणाचे आदेश देण्यात आलेले नाहीत. हे उच्च न्यायालयाच्या आदेशाचे थेट उल्लंघन असल्याचे कुतिन्हो यांनी सांगितले. ३ नोव्हेंबर रोजी हे कामगार स्पष्टीकरण घेण्यासाठी मडगाव पालिकेच्या गॅरेजमध्ये एकत्र आले असता, पालिकेचे अध्यक्ष दामोदर शिरोडकर स्वतः घटनास्थळी आले आणि कोणतेही वैध आदेश नसतानाही कामावर रुजू न झाल्यास कारवाईची धमकी दिली, असा आरोप संघटनेने केला आहे. शिरोडकर यांनी ''कामगारांनी मस्ती केली तर त्यांच्यावर च्या आदेशानुसार कारवाई होईल'' असे वक्तव्य केले असल्याचे सांगण्यात आले. यावर भीमशक्ती संघटनेने ला प्रश्न केला की, कामगारांना आदेशांशिवाय कामावर येण्यासाठी ''भाग पाडणे'' हा चा आदेश होता का? आणि आदेशाबद्दल विचारणा करणे म्हणजे 'मस्ती करणे' कसे? असा सवाल उपस्थित केला. संघटनेच्या कार्याध्यक्ष प्रतिभा बोरकर यांनी सांगितले की, या संपूर्ण प्रकरणातून अल्पसंख्याक आणि मागासवर्गीय समाजातील कामगारांवर अन्याय व भेदभाव स्पष्ट दिसतो. १२ कामगारांचे नियमितीकरण आणि दैनिक वेतनधारकांचे कामाचे आदेश तातडीने जारी करण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी केली. लिंकन गोम्स यांनी सांगितले की, निवडून आलेल्या मंडळातील काही 'आवडते' कामगार दीर्घ अनुपस्थित असतानाही त्यांना विशेष सवलती दिल्या जातात, मात्र कचरा संकलन करणारे गरीब कामगार सार्वजनिक सुट्ट्यांनाही काम करूनही त्रास सहन करत आहेत.भीमशक्ती संघटनेने इशारा दिला की, पालिकेचा हा अहंकारी व पक्षपाती वर्तन पुढे सहन केले जाणार नाही, आणि जर अन्याय कायम राहिला, तर संघटना अनुसूचित जाती, जमाती आणि अल्पसंख्याक कामगारांच्या समर्थनार्थ कायदेशीर पातळीवर लढा देईल.

## सट्टेबाजी प्रकरणात ईडीची मोठी कारवाई

### रैना, धवन यांची ११.१४ कोटींची मालमत्ता जप्त





**नवी दिल्ली । रयत समाचार**

मनी लॉन्ड्रिंगशी संबंधित एका हाय-प्रोफाइल सट्टेबाजी प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ED) मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत भारताचे माजी क्रिकेटपटू सुरेश रैना आणि शिखर धवन यांची तब्बल ₹११.१४ कोटी रुपयांची मालमत्ता तात्पुरती जप्त करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही कारवाई १ या ऑनलाईन बेटिंग प्लॅटफॉर्मशी निगडित आहे, जो भारतात प्रतिबंधित आहे. ईडीने धनशोधन प्रतिबंधक कायदा (PMLA) अंतर्गत तात्पुरता आदेश जारी करून ही मालमत्ता जप्त केली आहे. जप्त केलेल्या मालमत्तेचा तपशील खालीलप्रमाणे आहे:शिखर धवन: ₹४.५ कोटींची स्थावर मालमत्ता.

सुरेश रैना: ₹६.६४ कोटींची म्युच्युअल फंडातील गुंतवणूक. ईडीच्या तपासात असे उघड झाले आहे की, रैना आणि धवन या दोन्ही माजी क्रिकेटपटूंनी जाणूनबुजून १x Bet आणि त्याच्या परदेशी संस्थांशी जाहिरात करार केले होते. या करारांमुळे प्रतिबंधित असलेल्या बेटिंग प्लॅटफॉर्मला अप्रत्यक्षपणे प्रोत्साहन मिळाल्याचा गंभीर आरोप ईडीने केला आहे. हा तपास केवळ या दोन क्रिकेटपटूंवर थांबलेला नाही. अवैध बेटिंग ॲप्स आणि मोठ्या प्रमाणात करचोरीच्या आरोपांखाली ईडीने यापूर्वी युवराज सिंग, रॉबिन उथप्पा, सोनू सूद, उर्वशी रौतेला, मिमी चक्रवर्ती आणि अनुष्का हाजरा यांच्यासह अनेक प्रसिद्ध व्यक्तींची चौकशी केली होती. तपास अधिकाऱ्यांच्या मते, हे प्रकरण अवैध बेटिंग ॲप्सशी संबंधित आहे, ज्यांनी गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली आहे आणि मोठ्या प्रमाणावर करचोरी केली आहे. ईडीने स्पष्ट केले आहे की, भारतात 1xBet, FairPlay, Parimatch आणि Lotus365 सारखे बेटिंग प्लॅटफॉर्म कायद्यानुसार प्रतिबंधित आहेत. मात्र, हे प्लॅटफॉर्म १x Bet किंवा १x Bet Sporting Lines अशा , बनावट नावांनी जाहिरात करत आहेत. या जाहिरातींमध्ये वापरले जाणारे QR कोड वापरकर्त्यांना थेट सट्टेबाजीच्या साइट्सवर नेत असल्याचे ईडीच्या तपासात निष्पन्न झाले आहे. या कारवाईनंतर क्रिकेट वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. तथापि, या दोन्ही माजी खेळाडूंनी या संवेदनशील प्रकरणावर अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही.

## न्यायालये केवळ इमारती नसून लोकशाही मूल्यांचे प्रतीक- सरन्यायाधीश भूषण गवई

**मुंबई । रयत समाचार**


'न्यायालयीन इमारती या केवळ वास्तू नसून, त्या न्याय, समानता, बंधुता आणि स्वातंत्र्य या संविधानातील मूल्यांचे जिवंत प्रतीक आहेत. प्रत्येक नागरिकाला सुलभ न्यायप्रवेश मिळावा, हा न्यायव्यवस्थेचा आत्मा आहे,'' असे प्रतिपादन देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले. वांद्रे पूर्व येथील शासकीय वसाहत परिसरात उच्च न्यायालयाच्या नव्या संकुलाच्या पायाभरणी व कोनशिलेचे अनावरण कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले, तसेच न्यायव्यवस्था आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सरन्यायाधीश गवई म्हणाले, ''न्यायालयीन इमारती ही केवळ भव्य रचना नसून, त्या देशातील लोकशाही मूल्ये आणि न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास दृढ करणाऱ्या संस्था आहेत. ही वास्तू न्याय आणि पारदर्शकतेचे मंदिर ठरेल. नागरिक, वकील आणि न्यायाधीश यांना समसमान सुविधा मिळतील. महाराष्ट्र न्यायिक पायाभूत सुविधांच्या विकासात देशात अग्रगण्य राहिला आहे. नागपूर,



नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर येथे उभारल्या जाणाऱ्या न्यायालयीन संकुलांमुळे न्यायप्रक्रियेला गती व पारदर्शकता मिळणार आहे.'' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ''ही इमारत देशातील सर्वाधिक आधुनिक, तंत्रज्ञानाधारित आणि एआय-सक्षम न्यायालयीन वास्तू ठरेल. ती लोकशाही मूल्यांचे वैभव दर्शवेल, राजेशाही दिमाखाचे नव्हे. न्यायालयातील वकील व कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.'' मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांनी सांगितले, ''न्याय म्हणजे केवळ कायद्याची अंमलबजावणी नाही, ती लोककल्याणाची साधना आहे. न्यायव्यवस्था ही समाजातील नैतिकता आणि मूल्यांचे प्रतिबिंब आहे. समाजाचा विश्वास हीच न्यायसंस्थेची खरी प्रेरणा आहे.'' उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, ''राज्यघटनेच्या अमृत महोत्सवी वर्षात उच्च न्यायालयाच्या नव्या संकुलाचे काम सुरू होणे ही ऐतिहासिक घटना आहे. शासन न्यायव्यवस्था सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचवण्यास कटिबद्ध आहे.'' उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, ''आजचा दिवस महाराष्ट्राच्या न्यायव्यवस्थेच्या इतिहासातील नवे पर्व आहे. न्याय हा लोकशाहीचा पाया असून प्रत्येक नागरिकाला समान न्याय मिळावा, हेच शासनाचे ध्येय आहे. कोल्हापूर सर्किट बेंचला लवकरच कायमस्वरूपी बेंचचा दर्जा देण्यात येईल. तसेच नवीन संकुलासाठी आवश्यक निधी शासनाकडून उपलब्ध करून दिला जाईल.'' हा कार्यक्रम महाराष्ट्राच्या न्यायव्यवस्थेच्या इतिहासातील एक नवा अध्याय ठरला असून, या इमारतीतून लोकशाही मूल्यांचे वैभव आणि न्यायप्रवेशाची सुलभता दोन्ही एकत्र दिसून येणार आहेत.

बिबटच्या हल्ल्यात चिमुकलीचा मृत्यू

## जबाबदारांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा–विवेक कोल्हे



**कोपरगाव । किसन पवार**

कोपरगाव तालुक्यातील टाकळी चर परिसरात ५ नोव्हेंबर रोजी साडेतीन वर्षीय चिमुकलीवर बिबट्याने हल्ला करून तिचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, वनविभागाच्या निष्काळजीपणावर युवानेते विवेक कोल्हे यांनी तीव्र शब्दात टीका केली आहे.

टाकळी फाटा येथे मृतदेह घेऊन नागरिकांनी नगरमनमाड महामार्ग रोखत निषेध व्यक्त केला. यावेळी विवेक कोल्हे यांनी सांगितले की, 'रेंजर, राऊंड ऑफिसर आणि फॉरेस्ट गार्ड यांनी आपली जबाबदारी पार पाडली नाही. त्यांच्या निष्काळजीपणामुळे एका निरागस बालिकेचा जीव गेला आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा.'' कोल्हे पुढे म्हणाले की, ''कोपरगाव तालुक्यात सध्या ६० ते ७० बिबटे मुक्तपणे फिरत आहेत. पिंजरे अपुरे आहेत, आणि वनविभाग नागरिकांमध्ये जनजागृती करत नाही. ऊसतोडणीसाठी आलेल्या मजुरांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे तातडीने बिबट्यांचा बंदोबस्त करावा.'' ते म्हणाले, ''राज्य सरकारने अलीकडेच बिबट्यांच्या बंदोबस्तासाठी ११ कोटी २५ लाखांची तरतूद केली असली, तरी ती अपुरी आहे. नगर आणि पुणे या दोन जिल्ह्यांमध्येच सुमारे १३०० ते १४०० बिबट्यांचे अस्तित्व असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर कायमस्वरूपी उपाययोजना आवश्यक आहेत.'' कोल्हे यांनी पुढे सांगितले, ''जर प्रशासनाने पकडलेल्या बिबट्यांना कुठे सोडायचे याचे नियोजन केले आणि अभयारण्यात सोडण्याची परवानगी घेतली, तर अनेक सामाजिक संस्था व आम्ही स्वतः पुढाकार घेऊन पिंजरे तयार करून संख्या वाढविण्यासाठी मदत करू. मात्र, त्यासाठीचे नियम सुलभ करणे गरजेचे आहे.'' शेवटी कोल्हे म्हणाले, ''ज्या चिमुकलीचा मृत्यू झाला आहे, तिच्या कुटुंबाला शासनाने मदत करावी. तसेच वनविभागाने तातडीने कार्यवाही करून बिबट्यांचा बंदोबस्त करावा. अन्यथा आम्ही तीव्र भूमिका घेऊ.''

## १४ नोव्हेंबरला डॉ. निमसे यांचा अमृत महोत्सव सोहळा शरद पवार यांच्या हस्ते होणार गौरव

### 'कुलगुरू' व 'शिक्षण आणि विकास' या ग्रंथांचे होणार प्रकाशन

**अहमदनगर । रयत समाचार**

शिक्षण क्षेत्रातील प्रख्यात व्यक्तिमत्त्व आणि चार दशकांहून अधिक काळ प्रभावी योगदान देणारे माजी कुलगुरू व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्जेराव निमसे यांच्या अमृत महोत्सव सोहळ्याचे आयोजन शुक्रवार, ता. १४ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे. हा सोहळा कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे अमृत महोत्सव गौरव समिती आणि गणित विभाग माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला असून, रेल्वे स्टेशन रोडवरील सहकार सभागृहात सकाळी १० वाजता कार्यक्रमास प्रारंभ होणार आहे.

या कार्यक्रमात रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी केंद्रीय कृषिमंत्री ना. शरद पवार यांच्या हस्ते डॉ. निमसे यांचा शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावचे संस्थापक कुलगुरू डॉ. एन. के. ठाकरे असतील. तर माजी मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार निलेश लंके, आमदार संग्राम जगताप, तसेच मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या प्रसंगी डॉ. निमसे यांच्या शैक्षणिक, सामाजिक, संशोधनात्मक कार्यावर आणि ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी केलेल्या योगदानावर विशेष प्रकाश टाकण्यात येणार आहे.



अमृत महोत्सवाच्या निमित्ताने डॉ. निमसे यांच्या जीवनकार्याचा वेध घेणारा ''कुलगुरू'' हा गौरवग्रंथ (संपादक प्रा. गणेश भगत) तसेच ''शिक्षण आणि विकास'' हा शैक्षणिक ग्रंथ (संपादक डॉ. सर्जे राव निमसे व प्रा. गणेश भगत) यांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. हे दोन्ही ग्रंथ शिक्षण क्षेत्रातील अभ्यासक आणि संशोधकांसाठी मार्गदर्शक ठरणार आहेत. डॉ. सर्जेराव निमसे यांनी आपल्या ४४ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रेरित केले, संशोधनाला चालना दिली आणि शिक्षण क्षेत्रात नवचैतन्य निर्माण केले. त्यांच्या कार्याचा गौरव हा संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानाचा क्षण ठरणार असल्याची भावना त्यांच्या माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे.

संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन डॉ. निमसे यांच्या माजी विद्यार्थ्यांनी केले आहे. आपल्या कारकिर्दीत त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि लखनौ विद्यापीठ या दोन्ही प्रतिष्ठित विद्यापीठांचे कुलगुरूपद भूषविले आहे. तसेच त्यांनी इंडियन सायन्स काँग्रेसचे अध्यक्षपदही भूषविले असून, पुणे विद्यापीठातील विविध पदे आणि समित्यांवर प्रभावी कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षक घडले आहेत. या अमृत महोत्सव सोहळ्यास देशभरातील १७ आजी-माजी कुलगुरू, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, माजी विद्यार्थी आणि सर्व शिक्षणप्रेमींना उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक समितीकडून करण्यात आले आहे. कार्यक्रमस्थळावर पोहोचण्यासाठी नगरपुणे महामार्गावर सुरू असलेल्या कामांमुळे, उपस्थितांना मार्केटयार्ड येथील महात्मा फुले चौकातून सहकार सभागृहाकडे येण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. देशभरातील १७ आजी-माजी कुलगुरूंची उपस्थिती: डॉ. अशोक कोळसकर, डॉ. शिवाजीराव कदम, डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. एस. एन. पठाण, डॉ. एन. जे. पवार, डॉ. वासुदेव गाडे, डॉ. भूषण पटवर्धन, डॉ. उद्धव भोसले, डॉ. भरत कुमार आहुजा, डॉ. जयंत वैशंपायन, डॉ. अरविंद दीक्षित, डॉ. मनोज दीक्षित, डॉ. अनिल शुक्ला, डॉ. उपेंद्र द्विवेदी, डॉ. मनोहर चासकर, डॉ. के. बी. पाटील आणि डॉ. ज्ञानदेव म्हस्के.

## विद्यार्थी दिन

७ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण राज्यात विद्यार्थी दिन साजरा केला जातो. याच दिवशी म्हणजे ७ नोव्हेंबर १९०० साली विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतापसिंग हायस्कूल, राजवाडा चौक जिल्हा सातारा येथे शाळेत प्रवेश घेतला होता. त्यावेळी शाळेत भिवा म्हणून त्यांच्या नावाची नोंद करण्यात आली होती. या शाळेतील जनरल रजिस्टरमध्ये १९१४ या क्रमांकासमोर त्यांच्या नावाची नोंदणी व त्यासमोरील स्वाक्षरी ही ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून आजही शाळा प्रशासनाने जपून ठेवली आहे. या शाळेत ते १९०४ सालापर्यंत म्हणजे चौथी पर्यंत शिकले. ई स २००३ पासून पत्रकार अरुण जावळे हे हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा व्हावा यासाठी प्रयत्न करीत होते. २०१७ मध्ये बाबासाहेबांच्या शाळा प्रवेशाचे स्मरण म्हणून तसेच विद्यार्थ्यांना शिक्षण हेच उन्नतीचे एकमेव साधन असून त्याच्या परिश्रमाची जाण व्हावी यासाठी महाराष्ट्र सरकारने हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या दिवशी राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध पैलूंवर निबंध, वक्तृत्व, काव्य वाचन स्पर्धा आयोजित केल्या जातात. यावर्षी कोरोना आणि दिवाळी यामुळे शाळा, महाविद्यालये बंद असली तरी या स्पर्धा ऑनलाइन आयोजित केल्या जाणार आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश खऱ्या अर्थाने शैक्षणिक क्रांतीची आणि युगाची चाहूल म्हटली पाहिजे. कारण डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे पाऊल शाळेत पडल्यामुळे ते स्वतः सुशिक्षित आणि प्रज्ञावंत झाले आणि करोडो दलितांचे आणि वंचितांचे उध्दारकर्ते ही झाले. विशेष म्हणजे ज्या संविधानाचा आज सर्वात आदर्श संविधान म्हणून देशभर गौरव होत असतो त्या भारतीय संविधानाचे ते शिल्पकारही ठरले. परिणामतः भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मानवी मूल्ये रुजू शकली गेली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा शाळा प्रवेश दिन ही अत्यंत महत्वाची आणि इतिहासाला कूस बदलायला लावणारी घटना आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे आजीवन विद्यार्थी होते त्यांनी आपला विद्याव्यासंग शेवटपर्यंत जपला. आजचा विद्यार्थी हा या देशाचे भविष्य आहे. त्यामुळे आदर्श विद्यार्थी निर्माण होणे ही काळाची गरज आहे. जर देशात आदर्श विद्यार्थी निर्माण झाले तर आपल्या देशाला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. या ऐतिहासिक दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन! तसेच सर्व विद्यार्थी मित्रांना विद्यार्थी दिनाच्या हार्दीक शुभेच्छा!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# ‘ऊस सोन्यासारखा, पण भाव कवडीमोल’

## ऊस तोड बंद आंदोलन

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

ऊस दरवाढीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने शेवगाव तालुक्यातील घोटण येथे ऊस तोड बंद आंदोलन छेडण्यात आले. काही साखर कारखान्यांनी बळजबरीने ऊस तोड सुरू ठेवल्याने संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ज्ञानेश्वर, वृद्धेश्वर, गंगामाई, युटेक, प्रवरा आणि बालअंबिका या कारखान्यांकडे जाणाऱ्या ऊस वाहतुकीला अडवले. त्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. संघटनेची प्रमुख मागणी अशी की ऊस दराची पहिली उचल प्रति टन ₹३३०० रुपये जाहीर करण्यात यावी. मागील वर्षी कारखानदारांना ऊस गाळप आणि साखर विक्रीमधून मोठा नफा झाल्याने त्याचा योग्य लाभ शेतकऱ्यांना मिळावा, अशी मागणी करण्यात आली.



तसेच नापास साखर व इतर बाय-प्रॉडक्टमधून शेतकऱ्यांना अतिरिक्त ₹२०० रुपये प्रति टन देण्यात यावेत, अशी मागणी संघटनेने केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः ऊस वजनात फेरफार होत असल्याचे मान्य केले असल्याने बाहेरील काटा ग्राह्य धरण्यात यावा, अशीही संघटनेची ठाम भूमिका आहे.

आंदोलनस्थळी शेवगावचे तहसीलदार व पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी भेट देऊन आंदोलकांशी संवाद साधला आणि वाहने सोडण्याचे आवाहन केले. मात्र स्वाभिमानी शेतकरी संघटनेने स्पष्ट भूमिका घेतली की, ‘‘पहिली उचल ₹३३०० रुपये आणि मागील थकबाकी दिल्याशिवाय ऊस वाहतूक सुरू होणार नाही.’’ परिस्थिती गंभीर बनल्याने शेवगावपाथर्डी प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी हस्तक्षेप करून प्रश्न वरिष्ठ पातळीवर नेला. अखेर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्व साखर कारखानदारांची बैठक घेऊन लेखी आश्वासन देण्याचे प्रशासनाने मान्य केले. त्यानंतर स्वाभिमानी शेतकरी संघटनेने रात्री अकरा वाजता आंदोलन मागे घेतले. या घडामोडीनंतर प्रशासनाने प्रकरणाची माहिती साखर आयुक्त कार्यालयाला दिली असून, ऊस दरासंदर्भातील अंतिम निर्णय जिल्हाधिकारी व साखर आयुक्तांच्या संयुक्त बैठकीत घेतला जाणार आहे. या आंदोलनात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब लवांडे, जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब फटांगडे, तालुकाध्यक्ष अशोक भोसले, तसेच अमोल देवडे, हरिभाऊ कबाडी, अंबादास भागवत, नानासाहेब कातकडे, नारायण पायघन, तात्यासाहेब कताडे, फारुक सय्यद, फिरोज सय्यद, अशोक भागवत, शौकत शेख आदींसह मोठ्या संख्येने ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते. प्रशासनाने ऊस दराचा प्रश्न वरिष्ठ पातळीवर सोडवण्याचे लेखी आश्वासन दिले असून, लवकरच जिल्हाधिकारी व साखर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सर्व कारखानदारांची बैठक होणार आहे. संघटनेने स्पष्ट केले आहे की, समाधानकारक निर्णय न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन उभारले जाईल.

# श्रीगोंदा नगरपालिकेत ‘शहर विकास आघाडी’

## गोरख आळेकर यांच्या नेतृत्वाखाली नव्या राजकीय समीकरणांना प्रारंभ

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा नगरपरिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून राजकीय हालचालींना वेग आला आहे. याच पार्श्वभूमीवर शहरातील नव्या राजकीय शक्ती म्हणून गोरख आळेकर यांच्या नेतृत्वाखाली ‘शहर विकास आघाडी’ची स्थापना करण्यात आली आहे. आळेकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, ‘‘आमच्या शहरातील नागरिक आणि मतदारांना स्वतः चा उमेदवार ठरवायचा अधिकार आहे. आजपर्यंत मात्र बाहेरील गावांतील नेत्यांच्या उंबरठ्यावर जाऊनच उमेदवारी मिळत आली आहे. तो उमेदवार त्या नेत्याचा गुलाम असेल, किंवा त्यांच्या झोळीत पैसा भरला असेल, तरच उमेदवारी मिळते ही परंपरा आता थांबवायची वेळ आली आहे.’’ त्यांनी पुढे म्हटले की, ‘‘या नेत्यांना शहराच्या विकासाशी काहीही देणेघेणे नाही. त्यांचा एकमेव उद्देश पैसे कमावणे हाच असतो. मग अशा नेत्यांकडून शहराच्या प्रगतीची अपेक्षा ठेवायची का?’’ आळेकर म्हणाले की, अलीकडे झालेल्या बैठकीत काहींनी शहर विकास आघाडी करू नये, असा सल्ला दिला. त्यावर उत्तर देताना त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ‘‘आमच्या शहराची निवडणूक आम्हीच लढवणार. आम्ही कोणाचे गुलाम नाही. आमच्यावर आदेश देण्याचा अधिकार कोणालाही नाही. तुम्ही सल्ले तुमच्या गुलामांना द्या; आम्हाला नकोत.’’ आळेकर यांनी सांगितले की, शहर विकास आघाडी ही निवडणूक जात, धर्म, गट-तट यांपासून दूर राहून ‘विकास’ या एकाच मुद्द्यावर लढवणार आहे. या निवडणुकीसाठी २२ जागा आणि नगराध्यक्ष पदासाठी संपूर्ण पॅनल उभे करण्याची तयारी सुरू असून, ‘‘तरुण, तडफदार, दूरदृष्टी असणाऱ्या आणि नेत्यांच्या गुलामगिरीपासून मुक्त उमेदवारांना संधी दिली जाईल,’’ असे त्यांनी स्पष्ट केले. इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा, असे आवाहनही आळेकर यांनी यावेळी केले. शहराच्या विकासासाठी ही आघाडी नव्या राजकीय समीकरणांना प्रारंभ देईल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.



# वांबोरी चारीवरील शेवटच्या गावांला पाणी मिळण्यासाठी बूस्टर पंप बसवणार– मंत्री विखे

## स्व. शिवाजीराव कर्डिले यांचे स्वप्न पूर्ण करणार

**पाथर्डी । नितीन गटाणी**

मुळा धरणातील गाळ काढून अतिरिक्त पाणी निर्माण करण्यावर जलसंपदा विभागाने लक्ष केंद्रीत केले आहे. वांबोरी चारीवरील शेवटच्या गावालाही पूर्ण क्षमतेने पाणी मिळावे म्हणून बुस्टर पंप बसविण्याबाबत सर्वेक्षण करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. भविष्यात उपसा सिंचन योजनेचा प्रकल्प कार्यान्वित करून शेतकऱ्यांवरील वीज भार कमी करण्याचे स्व. शिवाजीराव कर्डीले यांचे स्वप्न पूर्ण करणार असल्याची ग्वाही जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. जलसंपदा विभागाच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या सुमारे १४.६० कोटी रुपयांच्या निधीतून वांबोरी चारी टप्पा १ च्या कामाचे भूमिपूजन ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी आमदार मोनिका राजळे, संग्राम जगताप, खासदार डा. सुजय विखे पाटील, अक्षय कर्डीले, अधिक्षक अभियंता राजेश गोवर्धने, कार्यकारी अभियंता सायली पाटील, तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी उपस्थित होते. विखे पाटील म्हणाले की, ‘‘वांबोरी चारीच्या कामाला निधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि ते तातडीने सुरू करण्यासाठी स्व. कर्डीले साहेबांनी मोठा पाठपुरावा केला. त्यांचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीने आजचा दिवस ऐतिहासिक आहे.’’ ते पुढे म्हणाले की, ‘‘यापूर्वी पद्मभूषण स्व. बाळासाहेब विखे पाटील आणि लोकनेते गोपीनाथ मुंढे यांच्या प्रयत्नांमुळे या चारीच्या कामाला गती मिळाली होती. दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न या थोर नेत्यांनी पाहिले होते आणि महायुती सरकारच्या माध्यमातून ते साकार करण्याची संधी आता मिळाली आहे.’’ मुळा धरणाच्या ५२ कि.मी. लांबीच्या कालव्याची अवस्था जीर्ण झाल्याने त्याच्या अस्तरीकरणासाठी ११० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून त्या कामालाही सुरुवात झाली आहे. आज शुभारंभ झालेल्या टप्पा १ च्या कामासाठी १४.६० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून, मुळा धरणात अतिरिक्त पाणी निर्माण करण्यावर विभागाने लक्ष केंद्रीत केले आहे. राज्यातील धरणातून गाळ काढण्याच्या धोरणाला मंत्रिमंडळाची मंजुरी मिळण्याच्या मार्गावर असून, प्रायोगिक तत्त्वावर मुळा धरणाचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे दोन ते अडीच टीएमसी पाणी अतिरिक्त उपलब्ध होणार आहे. यापूर्वी वांबोरी चारीवरील उपसा सिंचन योजनेच्या वीजबिलाचा प्रश्न कायम अडचणीचा ठरायचा. ही समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी १५० मेगावॅट क्षमतेचा फ्लोटींग सोलार प्रकल्प उभारण्याचा विचार विभागाकडून सुरू आहे. यामुळे शेतकऱ्यांवरील वीज भार कमी होईल. मढीपर्यंत पाणी पूर्ण क्षमतेने जात नसल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारीची दखल घेऊन घाटशिरसजवळ बुस्टर पंप बसविण्यासाठी सर्वेक्षणाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच १४ टीएमसीच्या खाली फुट व्हॉल्व गेल्यानंतर टप्पा १ साठी पाणी उचलता येत नाही, यावर उपाययोजना करण्यात येणार असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. खासदार डा. सुजय विखे पाटील म्हणाले की, ‘‘वांबोरी चारीच्या प्रश्नाचे गांभीर्य स्व. कर्डीले साहेबांनी सातत्याने मांडले. त्यांच्या पाठपुराव्यातून झालेल्या कामाच्या शुभारंभाला ते हजर नसल्याचे दुःख आहे. आज या भागातील लोकप्रतिनिधींना या प्रश्नाची जाणीवही नाही. पराभव झाला असला तरी या भागाच्या विकासासाठी विखे परिवारालाच पुढाकार घ्यावा लागला हे वास्तव आहे.’’ दरम्यान अक्षय कर्डीले यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ‘‘स्व. कर्डीले साहेबांप्रमाणेच मीही तुमच्या सेवेत राहण्याचा प्रयत्न करणार आहे. विखे, राजळे, जगताप परिवारांच्या मार्गदर्शनाखाली वांबोरी चारीच्या विकासाची वाटचाल सुरू राहील.’’



# मनी पॉवर फॅक्टरमुळे निष्ठावंत चिंतातूर; निष्ठावंतांची नाराजी भोवण्याची शक्यता

**श्रीरामपूर । रयत समाचार**

शहरात नगरपालिका निवडणुकीचा ज्वर आता वाढत असून विविध भागातून इच्छुकांनी पक्षांकडे तिकिटाची मागणी करीत आपणच त्यासाठी पात्र आहोत हे पटवून देण्याचा प्रयत्न होत आहे.

नगरसेवक पदाबरोबरच नगराध्यक्षाची देखील निवडणूक होणार असल्याने प्रत्येक पक्षात नगराध्यक्षाच्या नावावर जवळजवळ एकमत झालेले असले तरी विविध प्रभागातून उमेदवार देण्यासाठी सर्वच पक्षांना मोठी कसरत करावी लागण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

रेल्वे लाईन मुळे शहराचे दोन भाग झाले असून रेल्वे पलीकडे आठ तर रेल्वे अलीकडे नऊ प्रभाग आहेत दोन्हीकडे १७ प्रभागातून ३४ उमेदवार निवडून येणार आहेत.

काँग्रेस पक्षाकडे रेल्वे पलिकडील आठ भागांमध्ये प्रत्येक भागात इच्छुकांची संख्या मोठी आहे.यामध्ये अनेक निष्ठावंतांचा समावेश आहे.गेले महिनाभर या इच्छुक निष्ठावंतांनी रील्स व सोशल मीडिया द्वारे आपल्या नेत्याचा तसेच आपला स्वतःचा प्रचार करण्याचा प्रयत्न केला आहे.मात्र निवडणुकीमध्ये मनी पॉवर असणाऱ्यांना प्राधान्य देण्याचा प्रघात असल्याने निष्ठावंतांवर मोठ्या संख्येने अन्याय देखील होणार आहे.एका इच्छुक उमेदवाराने तर प्रभागातील दोन्ही उमेदवारांचा खर्च मी करतो, वाटल्यास पाच हजार रुपयांपर्यंत फुली वाटतो अशी ऑफर पक्षाच्या श्रेष्ठींना केली आहे.त्यामुळे मनी पावर चा परिणाम जर तिकीट वाटपात झाला तर इतर जे इच्छुक आहेत ते कोणती भूमिका घेणार आणि त्याचा फायदा नेमका कोणाला होणार व तोटा कोणाला होणार याबाबत आता तर्कवितर्क लावले जात आहेत.

पक्षश्रेष्ठींनी ज्या भागामध्ये उमेदवार जवळ जवळ फायनल केलेले आहेत त्यांना कामाला लागा असा सुप्त होकार दिला आहे तर ज्या भागांमध्ये इच्छुक जास्त आहेत त्या ठिकाणी सर्वांशी विचार विनिमय करून निर्णय घेऊ असे सांगून इच्छुकांना सबुरीचा सल्ला दिला जात आहे.

श्रीरामपूर शहरांमध्ये काँग्रेस पक्षाची शहर कार्यकारिणी सध्या अस्तित्वात नसल्याने आमदार हेमंत ओगले, उपनगराध्यक्ष कारण ससाणे,काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर,शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर,माजी उपनगराध्यक्ष अंजुमभाई शेख व मुजफ्फर भाई शेख व तालुक्यातील इतर काही प्रमुख लोक हेच श्रेष्ठ म्हणून सध्या भूमिका बजावीत आहेत.

निर्णय घेणाऱ्या नेतेमंडळींच्या मनात कोण आहे आणि ते कशा पद्धतीने आपल्या मनातील उमेदवार पक्षातील इतरांना पटवून देतात यावर काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांची भवितव्य अवलंबून आहे.

प्रत्येक भागातून निष्ठावंत आहे परंतु एम फॅक्टर कमकुवत आहे अशी नावे मागे पडताना दिसत आहे. यातूनच सोशल मीडियावर सुद्धा वेगवेगळ्या प्रतिक्रिया आता उमटू लागल्या आहे.या सर्व परिस्थितीमध्ये पक्षाचे श्रेष्ठ कसा मार्ग काढणार आणि नगराध्यक्ष पदाचे उमेदवाराला या सर्व घडामोडींचा नेमका फायदा होणार की तोटा होणार हे तीन तारखेला होणाऱ्या मतमोजणीतूनच दिसणार आहे. इच्छुक उमेदवारांची शिष्टमंडळे आता श्रेष्ठींना भेटीस येत असून वेगवेगळ्या लोकांमार्फत फोन करून सुद्धा उमेदवारी मिळविण्यासाठी सर्व इच्छुक प्रयत्नशील आहेत.

# कळमकर यांच्या नेतृत्वाखाली नव्या उमेदीने पक्ष बांधणीची सुरूवात– संजय झिंजे

## जिल्हाध्यक्षपदी दादाभाऊ कळमकर यांच्या निवडीबद्दल सत्कार



**अहमदनगर । रयत समाचार**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार गट) अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी दादाभाऊ कळमकर यांच्या निवडीबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी माजी नगरसेवक संजय झिंजे, उद्योजक शरद मडूर, प्रा. एल. बी. म्हस्के, धनंजय देशमुख, सुभाषराव बर्वे, बाबासाहेब जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. माजी नगरसेवक संजय झिंजे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, ‘‘दादाभाऊ कळमकर हे पक्षाचे अनुभवी, संयमी आणि जनतेशी निगडित नेते आहेत. १९९७ ते २००९ या कालावधीत त्यांनी जिल्हाध्यक्ष म्हणून प्रभावी नेतृत्व केले. त्यांच्या जनसंपर्कामुळे आणि कार्यक्षमतेमुळे पक्षाने जिल्ह्यात भक्कम पाय रोवले. आता त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षात पुन्हा नवचैतन्य निर्माण होईल,’’ असे ते म्हणाले. कळमकर हे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे विश्वासू सहकारी मानले जातात. त्यांच्या एकनिष्ठ कार्यशैलीमुळे आणि सर्वत्र असलेल्या जनसंपर्कामुळे पक्ष संघटनाला बळ मिळेल, असा विश्वास झिंजे यांनी व्यक्त केला. उपस्थित मान्यवरांनीही कळमकर हे पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते असून, जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसची घडी मजबूत करण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा राहणार असल्याचे नमूद केले. त्यांच्या नेतृत्वामुळे येत्या काळात पक्षाला नवी दिशा आणि बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# नगराध्यक्ष पदाचा उमेदवार कोण? चर्चांना उधान

## इच्छुकांचा जीव टांगणीला

**पाथर्डी । नितीन गटाणी**




आगामी नगरपरिषद निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाचा तिढा अद्यापही न सुटल्याने शहरात विविध चर्चांना उधान आले आहे. प्रत्येक इच्छुक उमेदवाराचे कार्यकर्ते आपल्या नेत्यालाच पक्षाची उमेदवारी मिळणार, असा ठाम दावा करत आहेत. त्यामुळे भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (एपी) तसेच इतर पक्षांचे तिकीट नेमके कोणाला मिळणार याकडे मतदारांचे लक्ष लागले आहे.

सत्ताधारी भारतीय जनता पक्षाकडून नगराध्यक्ष पदासाठी माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, नंदकुमार शेळके, डॉ. मृत्युंजय गर्जे, माजी उपनगराध्यक्ष बजरंग घोडके, बंडूशेठ बोरुडे तसेच युवा नेते अमोल गर्जे अशी इच्छुकांची मोठी यादी आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (एपी) गटाकडून माजी नगरसेवक संजय भागवत आणि डॉ. दीपक देशमुख यांनी वरिष्ठ नेत्यांच्या भेटी घेतल्या आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी) पक्षाकडून माजी नगरसेवक बंडू पाटील बोरुडे हे प्रबळ दावेदार मानले जात असून त्यांनी प्रचाराची जोरदार तयारीही सुरू केली आहे.

आम आदमी पक्ष, काँग्रेस, मनसे, वंचित बहुजन आघाडी आणि काही अन्य पक्षांनीही नगराध्यक्ष पदासाठी तयारी सुरू केली आहे. यात आजी-माजी नगरसेवक, माजी नगराध्यक्ष तसेच काही युवा नेतेही इच्छुकांच्या रांगेत आहेत. काहींनी मतदारांच्या घरोघरी जाऊन संपर्क मोहीम हाती घेतली आहे, तर काही जण सोशल मीडियावर डिजिटल प्रचार राबवत आहेत. ‘नगराध्यक्ष पदासाठी मीच योग्य उमेदवार’ असा दावा करत त्यांनी आपली पूर्वीची कामगिरी ठळकपणे प्रसारित केली आहे. दरम्यान, भाजपचे काही इच्छुक राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या भेटीसाठी गेले असल्याची माहिती आहे. नामदार मुंडे कोणाची शिफारस करतात अथवा तटस्थ राहतात, यावर आगामी उमेदवारीचे गणित अवलंबून राहणार असल्याचे पक्षांतर्गत चर्चेत आहे.

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**